# प्रकरण दुसरे

# प्रकरण दुसरे

## संशोधनासंबंधी संदर्भ साहित्याचा आढावा

२.१ प्रस्तावना

२.२ संबंधित संशांधनाचा आढावा

२.२.१ उद्दिष्टे — स्पष्टीकरण व पद्धती या संबंध संशोधन साहित्याचा आढावा

२.२.२ पाठनियोजनाच्या संबंधीचा संशोधनाचा आढावा

२.२.३ पाठयपुस्तक विश्लेषणासंबंधित संशोधनाचा आढावा

२.२.४ अध्यापन पद्धतीसंबंधी संशोधनाचा आढावा

२.२.५ आशयासंबंधी संशोधनाचा आढावा

२.२.६ आशयघटक कल्पना, भावना व विचार यासंबंधी संशोधनाचा आढावा

२.३ समारोप

# प्रकरण दुसरे

# संशोधनासंबंधी संदर्भ साहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये समस्येशी निवडीत संशोधनाचे समालोचन केलेले आहे.

संशोधन समस्येशी संबंधित संशोधनाचे समालोचन करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे संशोधकाला संशोधन पद्धती आणि संशोधनाचे तंत्र याबद्दल निश्चित कल्पना येते.

## संबंधित संशोधनाचे महत्त्व

१) संशोधनाची अनावश्यक पुनरावृत्ती होत असेल तर ती टळते.

२) संशोधनाचे ज्ञान वाढीस लागते. संशोधनाची कार्यपद्धती समजते. संशोधन कौशल्य लक्षात येते.

३) संशोधकाने निवडलेल्या संशोधन क्षेत्रात आजपर्यंत झालेल्या संशोधनाची माहिती मिळते.

४) संशोधन समस्येची निवड करण्यास उपयोगी असते. निवडलेल्या समस्येचे विश्लेषण व समस्या कथन करताना मार्गदर्शन होते.

५) संशोधनाची मर्यादा ठरविणे सोपे जाते.

६) संशोधनाचा आराखडा तयार करण्यास उपयुक्त आहे.

७) श्रम व वेळेची बचत होते. संशोधकाचा आत्मविश्वास वाढीस लागतो.

८) संशोधनास आपल्या संशोधनासाठी उपयुक्त साधने ठरविता येतात.

९) संशोधनकास आपल्या संशोधनाची गृहीतकृत्ये करण्यास मदत होते.

१०) संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग होतो.

११) संशोधनातील माहितीला आधार देता येतो.

या संशोधनाच्या आढाव्यामध्ये खालीलप्रमाणे विभाग केले आहेत.

१) उद्दिष्टे स्पष्टीकरण

२) पाठनियोजन

३) पाठ्यपुस्तक विश्लेषण

४) अध्यापन पद्धती

५) आशय घटक

## २.२ संबंधित संशोधनाचा आढावा

वरील विभागाप्रमाणे संबंधित संशोधनाचा आढावा घेण्यात आला आहे.

### २.२.१ उद्दिष्टे-स्पष्टीकरण व पद्धती यासंबंधी संशोधन साहित्याचा आढावा

**शर्मा. (१९७२)**

विद्यार्थ्याचे ज्ञान, आकलन आणि उपयोजन यांचा शिक्षकांच्या वर्गांतर्गत व्यवहारामध्ये दृढ संबंध आढळतो.

निष्कर्ष

उद्दिष्ट स्पष्टीकरण या संबंधी वरील संशोधनामध्ये असे आढळून आले की, विद्यार्थ्याच्या ज्ञान आकलन आणि उपयोजन यांच्या उपयोगाच्या शिक्षकाच्या वर्गांतर्गत व्यवहारात दृढ संबंध असतो.

**भट्टाचार्य, जी.सी.(१९८४)**

भूगोल अध्यापनासाठी संस्थात्मक स्त्रोतांतून परिणामकारक अध्यापन पद्धती यावर संशोधन केले आहे.

**पटेल, ए.एम. (१९८४)**

गुजराथमधील माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनाची सद्यस्थिती या विषयावर संशोधन केले.

**अंजारिआ, आर. (१९८४)**

सायन्स अध्यापनामध्ये प्रणाली उपागमाचा वापर व उपयोग यावर संशोधन केले.

**सिंग, एस.पी. (१९८५)**

पदवीपूर्व स्तरावर जीवशास्त्र विषयाची उद्दिष्टे व अध्यापन पद्धती यावर संशोधन केले.

**पाटील, टी.बी. (१९८५)**

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील भूगोल अध्यापनाची सद्यस्थिती व समस्या यावर संशोधन केले.

**राव, ए.व्ही. (१९८६)**

गणित अध्यापनामध्ये शोधन पद्धती व पृथक्करण पद्धतीपैकी प्रभावी अध्यापन पद्धती कोणती यावर संशोधन केले.

**दासगुप्ता, जी. (१९८७)**

शालेय अर्थशास्त्र अध्यापनासाठी वैयक्तिक अनुदेशन या विषयावर संशोधन केले.

**जानी, जे. आय. (१९८७)**

माध्यमिक स्तरावरील भूगोल अध्यापनाची सद्यस्थितीचा अभ्यास यावर संशोधन केले.

**विश्वनाथ, टी.व्ही.(१९८७)**

व्यक्तीअभ्यास पद्धतीने अर्थशास्त्राचे अध्यापन या विषयावर संशोधन केले.

यांनी विविध शिक्षणक्रमातील उद्दिष्टे अध्यापनपद्धती यांवर संशोधन केलेले आहे. त्यात मिळालेले विषयावर महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे

१) गणित विषयासाठी बहुतांशी शिक्षक (९३%) व्याख्यानपद्धतीचा उपयोग करतात.

२) गणित अध्यापनाच्या संदर्भात क्षमताधिष्ठित प्रशिक्षण कार्यक्रमामुळे अधिक क्षमतेचे प्रभुत्व, परिणामकारक अध्यापन, बोधात्मक क्षमता, अभिरुची, अध्यापन क्षमता इत्यादींच्या बाबतीत पारंपरिकतेपेक्षा नविन पद्धती अधिक प्रभावी दिसतात.

३) सामाजिक शास्त्रात प्रायोगिक दृकश्राव्य साधनांचा उपयोग, अनुदेशन कार्यक्रम या पद्धतीबाबत विद्यार्थ्यांकडून स्वीकारार्हता कमी आढळते.

४) भूगोल अध्यापनात संकल्पना प्रतिमानापेक्षा उद्गामी अध्यापन प्रतिमान अधिक परिणामकारक ठरते.

५) इतिहास अध्यापनात व्याख्यान, कथन, इत्यादी शिक्षकाकडील पद्धतीचा वापर, विद्यार्थीकेंद्रीत पद्धतीपेक्षा जास्त प्रमाणात करता येतो.

६) विज्ञान अध्यापनात नेहमीच्या अध्यापन पद्धतीपेक्षा प्रणाली दृष्टिकोन अधिक उपयुक्त ठरतो.

उद्दिष्टे स्पष्टीकरण संबंधी संशोधनाच्या आढाव्यावरुन प्राप्त झालेला सर्वसामान्य निष्कर्ष पुढीलप्रमाणे

१) वर्गांतर्गत अध्यापनात ज्ञान, आकलन व उपयोजन या उद्दिष्टांना शिक्षक अधिक महत्त्व देतात.

## २.२.२ पाठनियोजनाच्या संबंधीचा संशोधनाचा आढावा.

**परकीनस. (१९६४-६५)**

यांनी पाठ टाचणाचे वर्गीकरण खालील पद्धतीने केले आहे.

१) वर्गातील सर्व विद्यार्थ्यांशी चर्चा करुन पाठनियोजन करावे.

२) प्रशिक्षणार्थी प्रश्न विचारतात विद्यार्थी उत्तरे देतात.

३) प्रशिक्षणार्थी व्यक्तिगत पाठ टाचण तयार करतात.

४) ज्या घटना घडतात त्या संदर्भात व्यक्तीगट कुलात चर्चा होते.

**ॲलन, डी.डब्ल्यु. आणि रायन. (१९६९)**

हर्बार्ट (१९६७) यांच्या मतानुसार पाठाच स्वरुप निश्चित करते वेळी प्रथम पाठाचे शिक्षक स्वतः सतर्क असतात का या संदर्भात विचार करायला हवा. शिक्षक स्वतः कृतीशील असतील तर हे कोणत्या मौखिक, लिखित साधनांचा उपयोग करणार आहेत. शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये दळणवळण होणार असेल तर त्यानुसार कोणती पद्धती असायला हवी. तेव्हा शिक्षकाच्या भूमिकेच विश्लेषण करता येईल.

यांच्या मतानुसार आज ही शिक्षण प्रक्रिया समाधानकारक नाही. त्यात अनेक दोष आहेत.

**झावोरिक. (१९७०)**

झावोरिक यांच्यानुसार पाठनियोजन व अध्यापन यांच्यात धन सहसंबंध आहे. जे प्रशिक्षणार्थी पाठनियोजन लक्षपूर्वक करतात ते विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना देऊ शकतात.

**टोन्स. आणि मॉरिस. (१९७२)**

यांनी असे मत व्यक्त केले आहे की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये ज्या पद्धती आहेत त्या सर्व अशास्त्रीय कालबाह्य आणि पारंपरिक आहेत. म्हणून आजच्या शिक्षण प्रशिक्षणामध्ये अनेक दोष निर्माण झाले आहेत. यांनी ध्येय, विषयज्ञान, आवृत्ति व मूल्यमापनात दोष दाखविले आहेत.

**बर्नेट, इ.एस. (१९७७)**

यांनी बी.एड् प्रशिक्षणार्थीवर संशोधन करुन खालील निष्कर्ष काढले आहेत. नियोजन आणि आवृत्ती हे एकदुसऱ्याशी संबंधित असतात. नियोजनात जे प्रश्न लिहले जातात तेच प्रश्न विचारले जातात अशा प्रकारे नियोजन आणि आवृत्तीचा संबंध स्पष्ट होतो.

**क्लार्क आणि सिंगर (१९७९)**

क्लार्क आणि सिंगर यांनी प्राथमिक शिक्षकांच्या पाठनियोजनन पद्धतीचा अभ्यास केल्यानंतर हे लक्षात आले की, १) प्रशिक्षणार्थी दैनंदिन पाठनियोजनापासून वार्षिक नियोजनापर्यंत सर्व नियोजन करतात. २) पाठनियोजन केल्याने प्रशिक्षणार्थींच्या अनेक मानसिक गरजा पूर्ण होतात. आणि ते बौंद्धिकदृष्ट्या अध्यापनास सज्ज होतो. ३) आंतरक्रियात्मक कृती करताना पाठटाचण मार्गदर्शक ठरते.

**पांडे,एस.एन. (१९८०)**

पर्यवेक्षण आवृत्ती पाठ का चिकित्सक अध्ययन या विषयावर बी.एड.शिक्षक प्रशिक्षणार्थीवर संशोधन केल्यानंतर खालील निष्कर्ष निघाले आहे.

१) पाठ घेताना जो विषयाचा घटक असतो त्या घटकाचे ज्ञान प्रशिक्षणार्थीला कमी असते.

२) बहुतांशी शाळा प्रमुखांचा प्रशिक्षण कार्यक्रमांच्या संदर्भात नकारात्मक दृष्टिकोन असतो.

**जोशी, ए.एन. (१९८४)**

यांनी बी.एड्.प्रशिक्षणार्थ्यांवर अध्यापन कौशल्यावर संशोधन केले आहे. अध्यापन कार्यक्रमात नियोजन आणि आवृत्तीत असणाऱ्या संबंधाचा शोध घेतलेला आहे. या संशोधनामध्ये त्यांनी ४३ प्रशिक्षणार्थींना पाठनियोजन करायला सांगितले व त्यातील किती प्रशिक्षणार्थीने व्यवस्थित पाठ घेतले हे पाहून खालील निष्कर्ष काढले आहेत.

१) पूर्णपणे आवृत्तीत बदल केल्यानंतर नियोजन व आवृत्ती यांच्यात घनिष्ट संबंध दिसून येतो.

२) सविस्तर लिहलेले पाठनियोजन हे सूक्ष्म अध्यापनाचे पाठनियोजन व प्रत्यक्ष अध्यापन यांची तुलना केली तर ते सूक्ष्म अध्यापनात प्रत्याभरण दिले जाते ते पारंपरिक सूक्ष्म अध्यापन पद्धतीपेक्षा अधिक प्रभावी असते.

**लकाडे, सुनिता सुरेश. (१९९८)**

बी.एड् प्रशिक्षणार्थीवर संशोधन केले आहे. (एम.फिल) पाठनियोजन का आदान प्रदान वर होनेवाले परिणामें का एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर संशोधन केले आहे. इयत्ता सातवी प्राथमिक स्तरावर संशोधन केले आहे.

निष्कर्ष

या संशोधना वरुन अध्यापन घटकाचे विवरण, मत, कल्पना, भावना, विचार यानुसार वर्गीकरण करुन अध्यापन केले जावे. त्यामुळे अध्यापनाला एक निश्चित दिशा मिळते व ते अधिक परिणामकारक होते.

पाठनियोजनाच्या संबंधी संशोधनाच्या आढाव्यावरुन प्राप्त झालेले सर्वसामान्य निष्कर्ष पुढीलप्रमाणे

१) अध्यापन परिणामकारक होण्यासाठी नियोजनाची आवश्यकता असते.

२) पाठाचे नियोजन हे नेहमीच लिखित स्वरुपात केले जात नाही. अनुभवी शिक्षक मानसिकरीत्या पाठाचे नियोजन करतात. तर अननुभवी शिक्षक लिखित स्वरुपात नियोजन करतात.

३) अध्यापन कौशल्य, अध्यापन पद्धती, मूल्यमापन इत्यादी कृती अनुभवी शिक्षकाची नित्यकर्मे बनल्यामुळे त्यांचा विचार ते नियोजनात करीत नाहीत. अनुभवी शिक्षक केवळ विदयार्थी व आशय यांना नियोजनात महत्त्वाचे स्थान देतात.

## २.२.३ पाठ्यपुस्तक विश्लेषणासंबंधित संशोधन आढावा.

विविध पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके यातील आशयाच्या विश्लेषणासंबंधीची पुढील संशोधने आहेत.

**जोशी, एम.जी. (१९७२)**

चौथीच्या सामान्य विज्ञान पुस्तकाचे आशय विश्लेषण केले आहे.

**शहाजहान, एम.एम. (१९८०)**

इयत्ता ६ वी व ७ वी वर्गावर प्रतिकृतींच्या माध्यमातून विज्ञानाचे अध्यापन यावर संशोधन केले आहे.

**गंगोह, एन. (१९८०)**

आंध्रप्रदेशमधील शिक्षक प्रशिक्षणावर चिकित्सक अभ्यास केला आहे.

**करीम, पी.आय.ए.(१९८२)**

केरळमधील माध्यमिक स्तरावरील इतिहासाच्या पुस्तकाचे राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रतिकृती व साहित्य निर्मिती यावर संशोधन केले आहे.

**इंगोले, आर.एन. (१९८५)**

माध्यमिक स्तरावरील इतिहास अध्यापनाच्या सद्यस्थितीचे विश्लेषण यासंबंधी संशोधन केले आहे.

याचे संशोधन विविध पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तके यांच्याशी संबंधित असुन सामान्य विज्ञान, इतिहास, भूगोल, इंग्रजी इत्यादी विषयांच्या प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील पाठ्यक्रमातील पाठ्यपुस्तकांच्या आशयाचे विश्लेषण त्यांनी केलेले आहे. त्यांच्या संशोधनाचे काही महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे

१) पाठ्यक्रम/ पाठ्यपुस्तकातील आशयाची निवड विद्यार्थ्यांच्या वयानुसार केलेली आढळते.

२) पाठ्यक्रम/ पाठ्यपुस्तकातील घटकात योग्य ती क्रमबद्धता आहे. कौशल्यापेक्षा ज्ञानावर भर दिला जातो.

३) अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांना अनुरुप असा आशय निवडलेला असतोच असे नाही.

**दुबे चित्रा (२००६)**

यांनी पीएच.डी.स्तरावर संशोधनासाठी पुढील विषय निवडला होता. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना आवश्यक राष्ट्रीय वारसासंबंधी शैक्षणिक साहित्याच्या

प्रभावशीलतेचा अभ्यास या विषयावर संशोधनक केले आहे. यातून निघालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१) इयत्ता आठवीच्या सर्व पाठ्यपुस्तकामध्ये भारताचा राष्ट्रीयवारसा या गाभातून घटकाशी संबंधित आशय आहे.

२) इतिहास पाठ्यपुस्तकामध्ये जास्तीत जास्त आशय हा भारताचा राष्ट्रीय वारसांशी संबंधित आहे.

३) इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांमध्ये भारताचा राष्ट्रीय वारसा या गाभातून घटकाची रुजवणूक होण्यास उपयुक्त आशय आहे.

४) इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांमध्ये भारताचा राष्ट्रीय वारसा याविषयी योग्य माहितीची रुजवण झालेली आहे.

**चव्हाण, यशवंत केशवराव. (२००६)**

यांनी पीएच.डी.स्तरावर संशोधन केले आहे. इयत्ता पहिली ते पाचवीच्या क्षमताधिष्ठित अभ्यास क्रमानुसार अध्ययन अध्यापन प्रक्रियेचा चिकित्सक अभ्यास या विषयावर केलेल्या संशोधनातून खालील निष्कर्ष निघालेले आहेत.

निष्कर्ष

१) इयत्ता पहिली ते पाचवीच्या अभ्यासक्रम हा अध्ययन अध्यापन क्षमतांवर आधारित आहे.

२) कृतीकेंद्रित प्रक्रियेचा आहे. (Activity based)

३) मूल्य शिक्षण व गाभाभूत घटकांनी परिपूर्ण असा आशय आहे.

४) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी उपयुक्त आहे.

वरील संशोधनातून प्राप्त झालेला निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे.

१) पाठ्यपुस्तकामध्ये आशयाचा क्रम विद्यार्थ्यांच्या वयानुसार आहे. तसेच घटकाचा क्रम योग्य आहे.

### २.२.४ अध्यापन पद्धतीसंबंधी संशोधनाचा आढावा

विशेष विषयाच्या अध्यापन पद्धतीच्या परिणामकारतेचे अध्ययन केले आहे.

**कमलकनाथन, टी.एस. (१९६८)**

यांनी माध्यमिक स्तरावर भौतिकशास्त्र अध्यापनासाठी पारंपरिक व समस्या निराकरण पद्धती यांची उपयुक्तता तपासली आहे.

**शर्मा, ए.के. (१९७५)**

आसाममधील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या गणित विषयातील संपादनाविषयी चिकित्सक अभ्यास यावर संशोधन केले आहे.

**मिश्रा, एस. (१९७६)**

यांचे संशोधन वेगवेगळ्या अध्यापन पद्धतीची परिणामकारकता पडताळण्याशी संबंधित आहे.

**गुप्ता, बी.एस. (१९७९)**

यांनी माध्यमिक स्तरावर भूमितीच्या प्रभावी साहित्याचा वापर यावर संशोधन केले आहे.

**मॅथ्यू, आर .(१९८०)**

माध्यमिक शाळेतील शिक्षकांची अध्यापन विषयाचे मूलभूत घटक यावर संशोधन केले आहे.

**हॉपर डब्ल्यू, ए.एफ. (१९८२)**

उच्च माध्यमिक स्तरावरील इयत्ता ११ वी च्या जीवशास्त्र अध्यापनासाठी प्रतिकृती वापरण्यासंबंधीचा दृष्टिकोन यावर संशोधन केले आहे.

**मोहम्मद, मियाँ. (१९८२)**

पारंपरिक इस्लाम शिक्षणसंस्थाचा २० व्या शतकातील विकास यावर अभ्यास व संशोधन केले आहे.

**भट्टाचार्य, जी.सी. (१९८४)**

भूगोल अध्यापनासाठी संस्थात्मक स्त्रोतांतुन परिणामकारक अध्यापन वृद्धी यावर संशोधन केले आहे.

**दिघल, के.सी. (१९८५)**

जीवशास्त्र विषयासाठी अध्यापन पद्धतीतील वाद यावर संशोधन केले आहे.

**राव, पी.टी. (१९८७)**

सायन्स शिक्षकाची वर्गातर्गत अध्यापनाची परिणामकारकता विश्लेषणात्मक अभ्यास यावर संशोधन केले आहे.

**अग्निहोत्री, एस.के. (१९८७)**

दहावीतील विद्यार्थ्यावर भौतिकशास्त्र विषयातील संपादनावर अध्यापन पद्धतीचा होणारा परिणाम यावर संशोधन केले आहे.

वरील संशोधनावरुन सर्वसामान्यपणे प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे

१) गणित अध्यापनामध्ये स्पष्टीकरणापेक्षा पृथक्करण हे तुलनेने अधिक उपयुक्त आहे. परंतु काही वर्गात दोन्ही पद्धती उपयोगी पडतात.

२) भूगोल या विषयामध्ये स्वयंअध्ययन, समूह अध्यापन आणि अध्यापकाबरोबर समूह अध्यापन या तिन्ही पैकी स्वयं अध्ययन जास्त उपयोगी आहे.

३) जीवशास्त्रात शोध पद्धती अधिक उपयोगी आहे.

४) गणित अध्यापनात शोध पद्धती अधिक उपयोगी आहे.

५) संस्कृत, व्याकरण, अध्यापनात पारंपरिक व्याख्यान तसेच अनुदेशानात्मक कृती कार्यक्रम यापैकी अनुदेशनात्मक कृती कार्यक्रम अधिक उपयोगी आहे.

६) भूगोलात संकल्पना स्पष्टीकरणासाठी उद्गामी पद्धती वापरणे आवश्यक आहे.

७) प्रत्येक विषयासाठी आशयनुसार अध्यापन पध्दती वापरणे आवश्यक आहे.

गोपालन, ए.शहा ए.एन.चला, जे. (१९९७)

अध्यापनाच्या क्षमता मोजण्यासाठी साधन तयार करणे आणि शैक्षणिक तंत्रविज्ञानानुसार प्रशिक्षण राबविणे यावर संशोधन केले आहे.

अध्यापनाची परिणामकारकता मोजण्यासाठी गुणात्मक आणि संख्यात्मक संशोधन पद्धतीने अभ्यास केलेला आहे.

परिणामकारक अध्यापनासाठी खालील गोष्टीचे योगदान असते.

निष्कर्ष

१) आशयाची योग्य मांडणी व त्याला महत्त्व असावे.

२) विषयातील आशयाचे संघटन

३) प्रकटीकरणात स्पष्टता असावी.

४) आशय मांडण्याची शैली योग्य असावी.

५) प्रश्न विचारण्याचे कौशल्य योग्य असावे.

६) दृष्टिकोन सकारात्मक असावा.

७) गुणात्मक भाषाशैली असावी.

**वाघमारे, सुभाष कृष्णा. (२००५)**

विदयार्थी - शिक्षकांची अध्ययन शैली आणि कृती केंद्रीत अध्यापन पद्धती यांच्यातील आंतरक्रियेचा शैक्षणिक संपादन व आत्मविश्वासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास या विषयावर पीएच.डी.साठी बी.एड्.प्रशिक्षणार्थ्यांवर संशोधन केले आहे.

निष्कर्ष

१) अध्यापन पद्धतीचा विद्यार्थी शिक्षकांच्या शैक्षणिक संपादनावर ०.०१ स्तरावर लक्षणीय परिणाम होतो.

२) अध्ययन शैलीचा विद्यार्थी शिक्षकांच्या शैक्षणिक संपादनावर ०.०५ स्तरावर लक्षणीय परिणाम होत नाही.

३) अध्ययन शैली व अध्यापन पद्धती यांच्यातील आंतरक्रियेचा शैक्षणिक संपादनावर ०.०५ स्तरावर लक्षणीय परिणाम होत नाही.

४) अध्यापन पद्धतीचा आत्मविश्वासावर ०.०५ स्तरावर लक्षणीय परिणाम होतो.

५) अध्ययन शैलीचा आत्मविश्वासावर ०.०५ स्तरावर लक्षणीय परिणाम होत नाही.

६) अध्यापन पद्धती व अध्ययन शैली यांच्यातील आंतरक्रियेचा आत्मविश्वासावर ०.०५ स्तरावर लक्षणीय परिणाम होत नाही.

**कृष्ण, रेड्डी मारवी. (२००६)**

यांनी पीएच.डी.स्तरावरील संशोधनासाठी स्वामी दयानंद सरस्वती प्रणित विविध अध्यापन पद्धतीचा पृथक्करणात्मक अभ्यास संशोधन केले आहे.

यातून आलेले निष्कर्ष खालील प्रमाणे

१) पारंपरिक अध्यापनापेक्षा नवनवीन पद्धतीचा वापर करणे आवश्यक आहे.

२) नवनवीन अध्यापन पद्धतीमध्ये प्रयोग, स्पष्टीकरण यांचा वापर शिक्षकांनी करावा.

३) विविध उदाहरणे, वास्तव घटना यांचा आधार घ्यावा. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कृतीवर भर द्यावा.

४) प्रत्यक्ष अभ्यासासाठी विविध साहित्याचा वापर करावा.

**पांडे, रुची. (२००६)**

यांनी पीएच.डी. स्तरावर संशोधन केले आहे. त्यांचा विषय बी.एड् प्रशिक्षणार्थ्यांच्या शिक्षणातील व्यावसायिक व शैक्षणिक अभिवृत्ती विकासाचा अभ्यास असा होता. या संशोधनातून निघालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

निष्कर्ष

१) ७० % विद्यार्थ्यांची शिक्षणातील व्यावसायिक अभिवृत्ती अध्ययनासंदर्भात आहे.

२) १५% विद्यार्थी अध्यापक शिक्षणाकडे व्यवसाय या दृष्टीने पाहतात.

३) १०% विद्यार्थीच्या मते शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी अध्यापक शिक्षण महत्त्वाचे आहे.

४) ९५% विद्यार्थ्यांच्यामते शिक्षकी पेशा हा व्यवसाय व गुणवत्ता वाढीसाटी महत्त्वाचा आहे.

५) ५% विद्यार्थ्यांच्या ते शिक्षकी पेशा व्यवसाय व गुणवत्ता वाढीसाठी महत्त्वाचा नाही. यामध्ये काहीही संबंध नाही.

अध्यापन पद्धतीसंबंधी संशोधनाच्या आढाव्यावर सर्वसामान्यपणे प्राप्त झालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे

१) अध्यापनात विविध पद्धतीचा वापर करावा.

२) प्रत्येक विषयासाठी आशयानुसार पद्धती वापरणे गरजेचे आहे.

३) शिक्षकाच्या अध्यापन पद्धतीचा विद्यार्थी शिक्षकांच्या संपादणुकीवर परिणाम होतो.

## २.२.५ आशयासंबंधी संशोधनाचा आढावा

**जॉन, बी.कॅरोल (१९६३)**

यांनी कॅरोल प्रतिमानद्वारे हे सूचित केले आहे की, अध्यापकाने वर्गात केलेल्या अनुदेशानासाठी विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता व भाषिक क्षमता महत्त्वपूर्ण आहे.

हिलर .(१९६९)

यांनी विद्यार्थ्यांची उपलब्धी व शिक्षकाची भाषिक प्रवाहशीलता यांच्यात सार्थक सहसंबंध आहे. असा निष्कर्ष काढला आहे.

**डाहलॉप (१९७१) व लंडग्रेड (१९७२)**

यांच्या संशोधनातून असे दिसते की, शिक्षकाने विद्यार्थ्यांची आकलनक्षमता ओळखून बोलण्याची गती निश्चित केली पाहिजे.

**बेगल (१९७३)**

यांनी माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची आकलन क्षमता यावर संशोधन केले आहे.

शिक्षकांच्या आशय प्रकटीकरणाच्या जादा गतीमुळे विद्यार्थ्यांना आशय आकलनात अडथळा जाणवतो.

**लॅन्ड (१९७९-८०) व डॅनहॅम आणि लॅन्ड (१९८१)**

यांच्यानुसार अनिश्चित पद्, भाषिक शब्दजंजाळ, जादा आशय ज्याचे स्पष्टीकरण केले जात नाही. त्याचा संक्रमण, बलाघात इत्यादी पाच घटकांचा विद्यार्थ्यांच्या आकलनावर परिणाम होतो असे दिसून येते.

**मॅक कॅलेब आणि व्हाईट (१९८०)**

यांनी अध्यापनामध्ये क्रमबद्धतेचे महत्त्व सांगितले आहे. आशय स्पष्टीकरणात उद्दिष्टे सांगणे, स्पष्ट प्रस्तुतीकरण आणि मुख्य कल्पनेचे पुनर्निरीक्षण इत्यादी गोष्टीना महत्त्व असावे असे म्हटले आहे.

**कोबंस. (१९८१)**

यांच्या संशोधनातून अध्यापनात शिक्षकाच्या आशय स्पष्टतेला महत्व असते हा निष्कर्ष निघाला आहे.

**केनडी. (१९८१)**

यांनी माध्यमिक शिक्षकांवर संशोधन केले आहे. यांच्या मतानुसार १) शिक्षकाला ज्या गोष्टीचे ज्ञान नसते ती गोष्ट तो विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवू शकत नाही.

**फेअर हर्स्ट (१९८१) व स्टॅव्हिन (१९९१)**

यांनी प्राथमिक स्तरावर संशोधन करुन निष्कर्ष काढला की, प्राथमिक वर्गात आशय स्पष्टीकरणासाठी वेगवेगळ्या अध्यापन पद्धती योजल्या पाहिजेत.

ॲलिग्टन (१९८२-८३)

यांनी प्राथमिक स्तरावर संशोधन केले त्याचा निष्कर्ष असा की, प्राथमिक वर्गात आशय चर्चेसाठी कमीत कमी वेळ दिला जातो.

लेईन हार्डट आणि स्मिथ (१९८५), गुलमॅन (१९८७),बॉल आणि ॲडरसन (१९८९)

यांचे संशोधन अध्यापनशास्त्रीय विषयज्ञाना संबंधीचे आहे.

यांच्या संशोधनाअंती असे आढळून आले की, अध्यापकाच्या आशय ज्ञानाचा प्रभाव ते काय शिकवतात व कसे शिकवतात यावरुन दिसून येतो.

१) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान आणि विद्यार्थ्यांविषयक आकलनाशिवाय शिक्षकांनी कितीही सुस्पष्टरीत्या विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोहचवण्याचा प्रयत्न केला तरी ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नाही.

२) ज्या शिक्षकांची विषयाची बोधात्मक संरचना ही एकसंघ, परस्पर निगडीत संबोधापासून बनलेले असते ते शिक्षक नियोजनातून, अध्यापनातून मिळणाऱ्या माहितीच्या वापराबाबत अधिक चोखंदळ असतात.

बारको (१९८८)

यांच्या मते प्रशिणार्थीचे विषयज्ञान व पाठनियोजन यांचा दृढ संबंध आहे. प्रशिक्षणार्थीला आशयज्ञान जास्त असेल तर ते पाठनियोजन कमी सविस्तर प्रमाणात करतात. तसेच विदयार्थ्याबाबत जास्त संवेदनशील असतात.

**गॉसमन, विल्सन आणि शुल्मन (१९८९)**

यांनी माध्यमिक शाळेतील शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचा व्यक्तीअभ्यास यावर संशोधन केले आहे. त्यांच्या या संशोधनातून दिसून आले की

निष्कर्ष

१) छात्र अध्यापकाच्या आशयज्ञानाचा ते जे शिकवतात व जसे शिकवितात त्यावर परिणाम होतो.

२) आशयाच्या सखोल ज्ञानाचा प्रभाव अध्यापनाच्या विविध घटकांच्या (उदा-पद्धती, कौशल्ये, शैक्षणिक साधने इत्यादी) निवडीवर होतो.

३) ज्या छात्र अध्यापकांकडे एखाद्या विषयाचे विशेष ज्ञान असते ते विद्यार्थ्यांना संबोध आकलनाकडे आणि ज्ञान निर्मितीच्या त्या विषयाच्या पद्धतीकडे अधिक लक्ष देतात.

४) ज्याच्याकडे अशा स्वरुपाचे ज्ञान नसते ते पाठयपुस्तकात दिल्या गेलेल्या आशयापलीकडे जात नाहीत.

५) ज्या छात्र अध्यापकांना संरचना, त्यातील विविध घटक आणि संबोध यांच्यातील परस्पर संबंध माहीत आहेत ते अधिक परिणामकारकरीत्या शिकवतात.

## २.२.६ आशयघटक कल्पना, भावना व विचार या संबंधित संशोधनाचा आढावा

**लकाडे, सुनिता सुरेश. (२००२-०३)**

यांनी 'हिंदी भाषा के परिप्रेक्ष्य में शिक्षाशास्त्र महाविद्यालय तथा अध्यापक विद्यालय के प्रशिक्षणार्थीयों द्वारा आशय घटक के अनुसार किए गए पाठनियोजन का संप्रेषण प्रक्रिया पर होनेवाला परिणाम' या विषयावर पीएच.डी.साठी संशोधन केले आहे.

निष्कर्ष

आशय घटक लिपी, शब्द, वाक्य, मुहावरे, विवरण, कल्पना, भावना, विचार, संदेश परिभाषा, नियम यांच्या संदर्भात पाठनियोजन हे पारंपरिक पद्धतीपेक्षा प्रायोगिक पद्धती अधिक परिणाम कारक आहे.

आशय संबंधी संशोधनाच्या आढाव्यावरुन सर्वसामान्यपणे प्राप्त झालेल्या निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१) शिक्षकाची आशय स्पष्ट करण्याची क्षमता व विद्यार्थी अध्ययन क्षमता यांचा सार्थ सहसंबंध आहे.

२) अध्यापनात शिक्षकाच्या आशय स्पष्टतेला महत्त्व असते.

३) शिक्षकाच्या शब्द बंबाळामुळे अध्ययनात अडथळा निर्माण होतो.

४) आशय ज्ञानासाठी वेगवेगळया पद्धती योजल्या पाहिजेत.

५) आशय घटक लक्षात घेऊन अध्यापन केल्यास ते अधिक परिणामकारक ठरते.

वरील सर्व उद्दिष्टे व स्पष्टीकरण, पाठनियोजन, पाठ्यपुस्तक विश्लेषण, अध्यापन पद्धती, आशय घटक इत्यादी संबंधित संशोधनाच्या आढाव्यावरुन प्राप्त झालेले सर्वसामान्य निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

१) वर्गात शिकवताना शिक्षक ज्ञान, आकलन, उपयोजन या उद्दिष्टांना अधिक महत्त्व देतात.

२) परिणामकारक अध्यापनासाठी पाठनियोजन करणे गरजेचे आहे.

३) पाठयपुस्तकातील आशयाचा क्रम विद्यार्थ्यांच्या वयानुसार असतो.

४) प्रत्येक विषयासाठी आशयनुरुप अध्यापन पद्धती वापरणे गरजेचे आहे.

५) आशय घटक स्पष्ट करण्यासाठी आशय घटकानुसार योग्य अध्यापन पध्दती वापरावी.

## २.३ समारोप

वरील संशोधन साहित्याचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की, प्रस्तुत संशोधनासाठी घेतलेल्या विषयावर यापूर्वी संशोधन झाले नाही. म्हणून संशोधकाने हा विषय निवडलेला आहे.

पुढील प्रकारणामध्ये संशोधन कार्यप्रणाली विषयी माहिती देण्यात आली आहे.

# संदर्भ

मराठी

1) जोशी, अनंत. (१९९९). आशययुक्त अध्यापन पद्धती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

इंग्रजी

1) Kothari, C.R. (1985). Research methodology methods and technigues, wiley Eastern Limited, New Delhi

2) Kothari, C.R. (1990). Research Methodology, WISHWA PRAKASHAN.

3) Buch, M.B. (Ed) (1994). A survey of Research in education, M.S. University, Baroda.

4) Buch, M.B. (Ed) (1987). Third Survey of Research in Education, NCERT, Delhi.

5) Buch, M.B. (Ed) (1991). Fourth Survey of Research in Education, Vol II ,NCERT, Delhi.

6) Buch, M.B. (Ed) (1979). Second Survey of Research in Education, Sciety for Educational Research and Development. Baroda.

मासिके

भारतीय शिक्षण, भारतीय शिक्षण मंडळ प्रकाशन, पुणे.